PlanetRead

Literacy for a Billion

Movie: One Room Kitchen
Year: 2011

Song: Dur Dur Kothetari
Lyricist: Mahesh Tilekar

दूर दूर कोठे तरी
सुख आहे लपले
दूर दूर कोठे तरी
सुख आहे लपले
शोध कितीदा घेतला
शोध कितीदा घेतला
कधी नाही दिसले
दूर दूर कोठे तरी
सुख आहे लपले
दूर दूर कोठे तरी
मृगजळा मागे धावून
गेले श्वास ही थकून
मृगजळा मागे धावून
गेले श्वास ही थकून
दिशा धूसर जाहल्या
दिशा धूसर जाहल्या
देह प्राण विटले
दूर दूर कोठे तरी
सुख आहे लपले
दूर दूर कोठे तरी
हो...
शापितांचे जिणे जगून
भोग नशिबाचे भोगून
शापितांचे जिणे जगून
भोग नशिबाचे भोगून
भरल्या ओंजळी मधून
भरल्या ओंजळी मधून
काही ना उरले
दूर दूर कोठे तरी
सुख आहे लपले
दूर दूर कोठे तरी

जिवघेणे भास छळती
मुके डोळे अश्रू भरती
जिवघेणे भास छळती
मुके डोळे अश्रू भरती
किती लावता ठिगळ सारे
किती लावता ठिगळ सारे
आकाश फाटले
दूर दूर कोठे तरी
सुख आहे लपले
शोध कितीदा घेतला
शोध कितीदा घेतला
कधी नाही दिसले
दूर दूर कोठे तरी
दूर दूर कोठे तरी
दूर दूर कोठे तरी
कोठे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*